**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या सर्व आश्रमशाळा सुरक्षितपणे सुरु करण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : विभशा-२०२०/प्र.क्र.३०४/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२१ जानेवारी, २०२२.

वाचा - १. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि. १५ जून, २०२० व दि.१० नोव्हेंबर, २०२० व दि.१८ जानेवारी, २०२१.

२. या विभागाचे समक्रमांकाचे शासन परिपत्रक क्र. दि.१७ जून, २०२०

३. या विभागाचे समक्रमांकाचे पत्र दि.११ नोव्हेंबर, २०२०, दि.२० जानेवारी, २०२१ व

४. या विभागाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि.१२ फेब्रुवारी, २०२१

५. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.९४/एसडी-६ दि. ७ जुलै, २०२१.

६. या विभागाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि.९ जुलै, २०२१ व शुद्धीपत्रक दि. ०५ ऑगस्ट, २०२१.

७. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११३/एसडी-६, दि. १० ऑगस्ट, २०२१.

८. या विभागाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि. १२ ऑगस्ट, २०२१ व दि.०१ ऑक्टोबर, २०२१.

९. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११३/एसडी-६, दि. २४ सप्टेंबर, २०२१.

१०.आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक संआसे/कोविड/शाळा सुरु होण्यासंदर्भात सूचना/२५६०२-७१०/२०२१, दि.२८ नोव्हेंबर, २०२१.

११. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१७८/एसडी-६, दि. २९ नोव्हेंबर, २०२१.

१२. शासन आदेश, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्रमांक :- विभशा-२०२०/प्र.क्र.३०४/विजाभज-२, दि.११/०१/२०२२.

१३. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१७८/एसडी-६, दि. २० जानेवारी, २०२२.

**परिपत्रक :-**

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या विभागाच्या अंतर्गत असलेल्या राज्यातील ग्रामिण व शहरी भागातील सर्व आश्रमशाळा/विद्यानिकेतन (वसतीगृहासह) सुरु करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान कोरोना महामारीचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता राज्यातील सर्व आश्रमशाळा दि.१५ फेब्रुवारी,२०२२ पर्यंत बंद करण्याबाबत संदर्भ क्र.१२ अन्वये शासन आदेश निर्गमित



Scanned by CamScanner

करण्यात आले आहेत. तथापि, राज्याच्या सर्व भागात कोरोना महामारीचा वाढता प्रादुर्भाव सारख्या प्रमाणात नसल्याने व राज्यातील ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी आहे अशा भागातून शाळा सुरु करण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत असल्याने राज्यातील १ ली ते १२ वी च्या शाळा स्थानिक परिस्थितीचा विचार करुन दि.२४ जानेवारी, २०२२ पासून पुन्हा सुरु करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन परिपत्रक संदर्भ क्र.१३ अन्वये निर्देश दिले आहेत.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भ क्र.१३ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी विचारात घेऊन या विभागाच्या राज्यातील ग्रामिण व शहरी भागातील सर्व आश्रमशाळा/विद्यानिकेतन (वसतीगृहासह) दि.२४ जानेवारी, २०२२ पासून सुरु करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

३. आश्रमशाळा सुरु करण्यासाठी शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. दि.२४ जानेवारी, २०२२ पासून सुरु होत असलेल्या आश्रमशाळांमध्ये कोरोना निर्बंधाचे पालन करण्यात येत असल्याबाबत आढावा घेण्याच्या अनुषंगाने संबंधित प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी आश्रमशाळांना नियमित भेटी देऊन त्याबाबतचा अहवाल संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कैलास साळुंके )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक
३. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
५. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, (सर्व)
६. निवडनस्ती/(विजाभज-२).

Scanned by CamScanner